परिपत्रक क्रमांक 279 दिनांक 17/5/1992

विषय :- रजेच्या मुदतीत तात्पुरती व्यवस्था म्हणून अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत .

संदर्भ :- या कार्यालयाचे आदेश क्र. 132 दि.15/2/85 व आदेश क्र. 730 दिनांक 9/12/85 तसेच आदेश क्रमांक 471 दिनांक 13/8/1991 शासन निर्णय क्र. वेतन/1491/प्र.क्र.156/वेतन-3 वित्त विभाग, मंत्रालय दिनांक 2/1/1992 पहावे.

उपरोक्त विषया संदर्भात आपणांस असे कळविण्यात येते की, वरील आदेशान्वये ज्या कर्मचाऱ्यांची रजा आपल्या अधिकारांत मंजूर करण्यात येते, अशा प्रकरणांत जर तात्पुरती स्थानिक व्यवस्था करणे अत्यावश्यक असेल तर, त्याप्रमाणे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आल्या संबंधीचे स्पष्ट आदेश काढावेत . तसेच सदर आदेशाची प्रत धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मान्यतेसाठी सादर करावी.

आपल्या कार्यालयीन आदेशात अतिरिक्त कार्यभार सोपविल्याचा स्पष्ट उल्लेख नसल्यास, तसेच आदेशाची प्रत धर्मादाय आयुक्त यांचे मंजूरीसाठी सादर न केल्यास संबंधीत कर्मचाऱ्याचे विशेष वेतन प्रस्ताव मंजूरीसाठी या कार्यालयांत पाठवून नये , अशी प्रकरणे मुख्यालयांस पाठविल्यास त्यावर काहीही कार्यवाही न करता दप्तर जमा करण्यात येतील.

तसेच अतिरिक्त कार्यभार देण्याऐवजी शक्य तो दोन कर्मचाऱ्यांत काम विभागून दिलयास विशेष वेतनाचा प्रश्न उद्भवत नाही, असे शासनाने कळविले आहे. हा मुद्दा शक्य तो पाळण्याची पराकाष्ठा करावी.

वरील सूचना पाळाव्यात, कारण विभागीय कार्यालयांतील अधिकाऱ्यांना 30 दिवसापर्यंत रजा मंजूरीचे अधिकार आदेश देण्यात आलेले आहेत. वरील सूचना कटाक्षाने पाळण्यात याव्यात.

क.मो. देसाई,<br>
धर्मादाय आयुक्त,<br>
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

दिनांक :- 17/5/1992